# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 28.02.2013 (का.प.क्र.28) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 28.02.2013 (का.प.क्र.28) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
02. स. श्री.आगा खान मिया खान
03. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
04. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
05. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
07. स. श्री. खान अक्रम करीम खान
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
10. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
11. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**विषय क्र. 171 :** (विषय क्र. 154 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 18/02/2013 (का.प.क्र.27) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**
टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती :विषय क्रमाक 171 स्थगीत.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 172 :** (विषय क्र. 155 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 18/02/2013 (का.प.क्र.27) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7),03/08/2012 (का.प.क्र.8),10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.** टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती :विषय क्रमांक 172 स्थगीत.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 173 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भडकलगेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा बेट / परीसर सुशोभिकरण करणे आणि सोईस्कर चबुतरा बांधुन हाच पुतळा त्यावर पुन्हा स्थापीत करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन 2011-12 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे डी.एस.आर. नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.24,98,973/- चे आहे.

या कामासाठी निविदा बोलविण्यात आल्या असता श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20% जास्त दराची निविदा प्राप्त आहे. 20% जास्त दर स्वीकारणेसाठी मा.आयुक्त महोदय यांची दिनांक 16/01/2013 नुसार मंजुरी प्राप्त आहे.

श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र यांची 20% जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेच्या विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 173 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भडकलगेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा बेट / परीसर सुशोभिकरण करणे आणि सोईस्कर चबुतरा बांधुन हाच पुतळा त्यावर पुन्हा स्थापीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र यांची 20% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 174 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, UIDSSMT अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासनासोबत MoU (करारनामा) केलेला असून Reforms राबविणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. याकरीता Reforms and MoA Monitoring and Implementation Assistance करीता यापूर्वी जुन 2010 मध्ये विहीत पद्धतीचा अवलंब करुन निविदा कार्यवाही करण्यात आली होती. या प्रकल्पास साधारणतः चार ते पाच वर्ष लागणार असे अपेक्षित असल्याने निविदा कार्यवाही करतांना Request for Proposal (RFP) मध्ये Clause 1.3 Time frame -"The contract for providing Reforms and MoA Implementation and Monitoring Assistance shall be initially for an intial period of one year and there after extendible with mutual agreement" असे नमुद आहे. तसेच Clause 3 - "The agency should quote the financial offer in terms of monthly fees including all taxes. The offer will be for a period of one year which may be extended subject to satisfactory performance for further period with mutual agreement" असे नमुद आहे.

या प्रकरणी ई टेन्डरद्वारे क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स सोल्युशन्स लिमीटेडची नियुक्ती करण्यात आली आहे. क्रिसील संस्थेसोबत करण्यात आलेल्या Agreement मध्ये Clause -1 मध्ये "The Duration of the Agreement is for a period of 12 months from the date of the commencement of the assignment, i.e. from June 1st 2011 (Commencement Date ) upto May 31st, 2012 which may be entended subject to satisfactory performance for further period with mutual agreement" असे नमुद आहे. या प्रकरणी क्रिसील संस्थेला पहिल्या वेळेस तिन महिन्याचा व त्यानंतर चार महिन्याचा कालावधी वाढवुन दिलेला असून हा वाढीव कालावधी दिनांक 31.12. 2012 रोजी संपलेला आहे.

क्रिसील संस्थेने त्यांच्या उपरोक्त कालावधीमध्ये समाधानकारक काम केले आहे. या अंतर्गत Property Tax, Double Entry Accounting System, E- Governance, User Charges, Adminstrative Reforms व इतर Reforms राबविण्याची कामे सुरु आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासनासोबत केलेल्या करारनाम्यानुसार प्रत्येक टप्प्यावर Status of Reforms committed under MoA Agreement ची सांगड घालुन Reforms ची कामे सुरु आहेत. तथापि महानगरपालिकेतील Reforms ची कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत.

**क्रिसील संस्थेने दिनांक 15.12.2012 रोजी पत्र दिले असून निविदा अटी व शर्ती नुसार त्यांच्या कामाचा कालावधी पुढील एक वर्षाकरीता वाढवुन मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर पत्रामध्ये क्रिसील संस्था सद्या मुळ निविदेनुसार करीत असलेल्या कार्यव्याप्ती व्यतिरिक्त इतर कामेही करण्यास तयार असून सविस्तर माहिती पत्रामध्ये नमुद केलेली आहे.**

**क्रिसील संस्था सद्या करीत असलेली कामे खालीलप्रमाणे आहेत.**

1. **Reforms implementation assistance**
2. **JNNURM / UIDSSMT support assistance**
3. **Project implementation assistance on the water PPP project**

**या व्यतिरिक्त क्रिसील संस्था पुढील कालावधीमध्ये खालील कामे करण्यास तयार आहे.**

1. **Clousure Of Revised City Development Plan (CDP) - औरंगाबाद महानगरपालिकेने इतर संस्थेकडुन शहर विकास आराखडा (CDP) तयार केलेला असून सदर आराखडा हा केंद्र शासनाच्या भविष्यात येणाऱ्या JNNURM - II व इतर योजनांसाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार सुधारीत करण्याचे काम उपरोक्त कामांसोबत व निविदेतील मंजुर दराने क्रिसील संस्था करण्यास तयार असून सध्या हे काम क्रिसील संस्थेने सुरु केले आहे.**
2. **Transaction advisory services for developing Public Private Partnership (ppp) framework - औरंगाबाद महानगरपालिकेचा विविध सेवांवर होणारा खर्च कमी करुन महसूल वाढविण्याच्या दृष्टीने विविध प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविता येतील असे क्रिसील संस्थेचे मत आहे. या अंतर्गत Land Development, projects based on advertisement rights, energy saving for street lights, outsourcing contracts for SWM collection, transportation, treatment and desposal इत्यादी प्रकल्पांचा समावेश होऊ शकतो. सदर प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यासाठी आवश्यकतेनुसार RFP ची निविदा कार्यवाही करणे, पीपीपी ऑपरेटर अंतिम करणे, कन्सेशन ॲग्रीमेंट करणे इत्यादी कार्यवाही क्रिसील संस्था करण्यास तयार आहे. तथापि, असे पीपीपी प्रकल्प जर यशस्वी ठरुन महानगरपालिकेतर्फे पीपीपी ऑपरेटरची नियुक्ती करण्यासाठी LoA देण्यात आले तर अशा परिस्थितीमध्ये क्रिसील संस्था Success Fees म्हणून शुल्क आकारेल. सदर Success Fees बाबत संबंधीतांनी पत्रामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले आहे. "We will be pleased to offer you success fees of Rs. 10 Lakhs plus sevice tax for the first land development project and thereafter Rs. 5 Lakhs plus service tax per land development project. In the case of service oriented projects covering energy saving, advertisement etc we will take a success fee Rs. 10 Lakhs plus service tax per project. In the case of PPP project involving services like SWM the success fees will be far higher and can be mutually agreed upon if the same is to be done by us."**
3. **औरंगाबाद महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्याचे नियोजन असून क्रिसील संस्थेने या प्रकल्पासाठी काम सुरु केले आहे. या प्रकल्पासाठी RFP Document तयार करण्याचे काम सुरु असून याप्रकल्पाशी संबंधीत अधिकारी उदा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, सर्व वार्ड अधिकारी व उप अभियंता यांत्रिकी यांच्या सोबत वेळोवेळी बैठका होऊन निविदा दस्तावेज परीपुर्ण होण्यासाठी विविध बाबींवर सविस्तर चर्चा झाली आहे. या प्रकल्पाकरीता क्रिसील संस्थेचे काम सुरु आहे.**
4. **औरंगाबाद महानगरपालिकेचा रुपये 394.70 कोटी रक्कमेच्या जलनि:स्सारण प्रकल्पास केंद्र शासनाच्या UIDSSMT अंतर्गत मान्यता झालेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने शासनासोबत MoA केलेले आहे. या प्रकल्पास व JNNURM - II मधील प्रकल्पांना Contractual Advisory Support म्हणून क्रिसील संस्था काम करणार असल्याचे त्यांनी त्यांच्या सुधारीत offer मध्ये कळविले आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी विविध टप्प्यांवर क्रिसील संस्थेची मदत होणार आहे.**

दिनांक 11.12.2012 रोजी पीपीपी प्रकल्पांसंदर्भाने मा.सचिव, डिपार्टमेंट ऑफ इकॉनोमिक अफेअर्स, वित्त मंत्रालय, दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली दिल्ली येथे आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस औरंगाबाद महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा हे उपस्थित होते. औरंगाबाद शहराच्या समांतर जलवाहिनीचा पीपीपी प्रकल्प हा IIPDF योजनेतुन PPP Mode वर विकसीत करण्यात आला असून हा पथदर्शी प्रकल्प असून संपुर्ण देशभरातुन Source to Tap पर्यंतचा पहिलाच मोठा प्रकल्प असल्याने या प्रकल्पाच्या यशस्वितेकडे केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय, नागरी विकास विभाग आणि राज्य शासनाचे नगर विकास विभाग व पीपीपी सेल चे विशेष लक्ष असल्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT अंतर्गत समांतर जलवाहिनी योजनेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यात येत आहे. मुळ JNNURM / UIDSSMT योजनेचा कालावधी दिनांक 31.03.2012 रोजी संपलेला असून केंद्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक केलेले विविध Reforms पुर्ण करण्यासाठी आणि सध्या सुरु असलेल्या मंजुर प्रकल्पांची कामे पुर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी म्हणजेच मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. UIDSSMT योजने अंतर्गत केंद्र शासनाने त्यांच्या अनुज्ञेय अनुदानापैकी 50% रकमेचा पहिला हप्ता रुपये 143.87 कोटी रक्कम दिनांक 03.11.2009 रोजी व राज्य शासनाने त्यांच्या अनुज्ञेय अनुदानापैकी 50% रकमेचा पहिला हप्ता रुपये 17.94 कोटी रक्कम दिनांक 04.05.2011 रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस वितरीत केलेला आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने Reforms राबविण्यासंदर्भाने केंद्र शासनासोबत UIDSSMT अंतर्गत करारनामा (MoA) केलेले असून सदर Reforms राबविणे औरंगाबाद महानगरपालिकेस बंधनकारक आहे. त्यामुळे महानगरपालिकेने Reforms राबविल्याशिवाय अनुज्ञेय अनुदानाच्या उर्वरित दुसऱ्या हप्त्याची रक्कम मिळणार नाही. परिणामी समांतर जलवाहिनीच्या प्रकल्पास विलंब होऊ शकतो.

केंद्र शासनाच्या नियोजन विभागाचे दिनांक 28.03.2012 चे पत्र प्राप्त झाले आहे. केंद्र शासन JNNURM - II योजना लवकरच जाहीर करणार असल्याचे दिसते. सदर JNNURM - II योजनेतुन औरंगाबाद महानगरपालिकेतील विविध प्रकल्पांना निधी उपलब्ध होऊ शकतो. तथापि, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार औरंगाबाद महानगरपालिकेस शहर विकास आराखडा (CDP) तयार करणे, विविध Reforms राबविणे, विविध प्रकल्प राबविण्यासाठी रुपरेषा ठरविणे त्याअंतर्गत निविदा कार्यवाही करणे इत्यादी कामे / पुर्व तयारी करणे आवश्यक आहे.

क्रिसील संस्था ही Transaction Advisor म्हणून केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त सुचीतील संस्था आहे. तसेच यासंस्थेस अशा कामांचा अनुभव असून सध्या क्रिसील संस्था पिंपरी चिंचवड, नाशिक महानगरपालिकांमध्ये अशा प्रकारची कामे करीत आहे.

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत Reforms and MoA Monitoring and Implementation Assistence करीता क्रिसील संस्था रुपये 5,50,000/- प्रति महिना म्हणजेच रुपये 66 लक्ष वार्षिक दराने काम करीत आहे. मुळ निविदेनुसार एक वर्षांचा कालावधी व त्यानंतर वाढविलेला तिन व चार महिन्यांचा कालावधी दिनांक 31.12.2012 रोजी संपलेला आहे. या कालावधीत क्रिसील संस्थेने केलेले काम समाधानकारक आहे.पाणी पुरवठा पीपीपी प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम येत्या महिन्याभरामध्ये सुरु होऊ शकते. Project Monitoring अंतर्गत प्रत्येक टप्प्यावर क्रिसील संस्थेची महानगरपालिकेस मदत होणार आहे. तसेच वेळोवेळी शासनाला द्यावयाचे विविध अहवाल (Quarterly Progress Report) तयार करण्यासाठी क्रिसील संस्थेची मदत होणार आहे.

केंद्र शासनाने UIDSSMT अंतर्गत मंजुर योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे आणि केंद्र शासनामार्फत JNNURM -II ही योजना जाहीर होणार आहे. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत Reforms and MoA Monitoring and

**Implementation Assistence करीता विविध कामे करण्यासाठी क्रिसील संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यातील तरतुदीनुसार व निविदा मंजुर दराने म्हणजेच रुपये 5,50,000/- प्रति महिना (रुपये 66 लक्ष वार्षिक दराने ) काम करण्यासाठी केंद्र शासनाने UIDSSMT साठी दिलेल्या मुदतवाढी पर्यंत म्हणजेच दिनांक 31.03.2014 पर्यंत कालावधी वाढवुन देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.**

**करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती :विषय क्रमांक 174 स्थगीत ठेवण्यात येतो, विषयामधील इंग्रजी अनुवाद मराठी भाषेमध्ये रूपांतर करून सभेसमोर आणण्यात यावा.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा तसेच विषयामधील इंग्रजी अनुवाद मराठी भाषेमध्ये रूपांतर करून पुढील सभेसमोर ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 175 :** **(विषय क्र. 156 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 18/02/2013 (का.प.क्र.27) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)**

**कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्रं. हॉटेल विटस ते आनंद गाडे चौक पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बांधणे, ड्रेनेज लाईन बदलणे व सौंदर्यीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.1,19,83,122/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्रं.72 दि.17/12/2012 अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असून, सदरील कामासाठी निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01. | मे. एल. के. कन्स्ट्रक्शन | 9.99 % जास्त दराने |
| 02. | मे. उदय इंजिनियरिंग वर्क्स | 17.01 % जास्त दराने |

**वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी तथापी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99 % जास्त आहे.**

**तथापी वाटाघाटी अंतर्गत मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99 % जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. करीता मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 175 मंजूर करण्यात येतो.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रं. हॉटेल विटस ते आनंद गाडे चौक पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बांधणे, ड्रेनेज लाईन बदलणे व सौंदर्यीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99 % जास्त दराचे निविदाधारक मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**चर्चा :**

**श्री.नारायण कुचे :लॉटरीवर एलबीटी आकारणी करणेबाबत मागील बैठकीत निर्देशित करण्यात आले होते खुलासा करण्यात यावा. शासनाकडे लॉटरीला एलबीटी माफ करणेसंदर्भात पत्रव्यवहार का करण्यात आला. शासनाने दिलेल्या जी.आर.नुसार कार्यवाही अपेक्षित होती.**

एलबीटी कक्ष प्रमुख :प्रशासनातर्फे 7 फेब्रुवारी 2012 रोजी लॉटरी टिकीटावर एलबीटी माफ करणेसंदर्भात शासनाला कळविण्यांत आलेले आहे. परंतु दि.18.02.2013 रोजीच्या मा.स्थायी समिती सभेने लॉटरीवर एलबीटी लागु करण्यासंदर्भात शासनाकडे पाठविलेले पत्र रद्द करणे बाबत कळविण्यांत आलेले आहे.

श्री.नारायण कुचे :शासन निर्णयात नमुद केले होते का? एलबीटी लागु करू नये. शासनाने अभिप्राय मागविला होता का?

एलबीटी कक्ष प्रमुख :शासनाचे 16 फेब्रुवारी 2013 रोजी पत्र आलेले आहे.

श्री.नारायण कुचे :शासनाचे निर्देश असतील की, एलबीटी लावु नका त्यानुसार कार्यवाही करावी. एलबीटी माफीचे पत्र का पाठविण्यात आले.

एलबीटी कक्ष प्रमुख :कुठल्याही महानगरपालिकेमध्ये लॉटरीवर एलबीटी आकारली जात नाही.

श्री.नारायण कुचे :शासनाच्या नॉर्मस् मध्ये एलबीटी आकारण्यात येवु नये म्हणुन आहे का?

एलबीटी कक्ष प्रमुख :शासन एलबीटीचे शेडयुल एकत्रित करणार आहे. लॉटरी टिकीटासह इतर वस्तुंवर एलबीटी समाप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मा.सभापती :वारंवार सदरील चर्चा होत आहे. लॉटरीवर एलबीटी आकरण्याबाबत तसेच शासनाकडे लॉटरीवर एलबीटी माफ करण्याचे पत्र रद्द करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

एलबीटी कक्ष प्रमुख :स्थायी समितीने आदेशित केल्याप्रमाणे शासनाकडे पत्र पाठविण्यात आले आहे.

एलबीटी कक्ष प्रमुख :पोस्ट कार्ड, पोस्टाचे टिकीट, स्टॅम्प टिकीट, लॉटरी टिकीट यावर कर आकारणी करू नये म्हणुन शासन जी.आर. आहे.

श्री.नारायण कुचे :शासन जी.आर मागविण्यात यावे.

श्री.समीर राजुरकर :कचरा सफाई बाबत महानगरपालिका पुर्णपणे फेल झालेली आहे. मोठमोठे हुकलोडर स्किप लोडर कचऱ्याने भरलेले आहे. मुलभूत गरजा देणेमध्ये प्रशासन निष्फळ ठरलेले आहे. शहरात प्रत्येक वार्डामध्ये कचऱ्याचे ढिग साठत आहे. शहरात रोगराई पसरल्यास त्यास कोण जबाबदार आहे. कचरा उचलण्याबाबत ठोस निर्णय होणे अपेक्षित आहे. मा.आयुक्तांनी रात्रीच्या वेळी कचरा उचलण्याचा निर्णय घेतला त्याबाबतीत आऊटपुट काय आहे. लोकप्रतिनिधी म्हणुन कचरा उचलण्याचे सांगण्यात येते परंतु याबाबतीत प्रशासन याबाबतीत गंभीरतेने घेतलेले नाही. कचरा उचलण्यास वाहने किती आहे. कशा प्रकारे कचरा उचलला जातो. सार्वत्रिक जबाबदारी म्हणुन एका अधिकाऱ्यांनी जबाबदारी स्विकारण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :कचरा उचलण्याबाबत स.सदस्यांनी सांगीतल्यानंतर वाहने लावली जातात या वाहनांनवर कुणाचेच नियंत्रण नाही. साफसफाईची यंत्रणा योग्यरितीने कार्यान्वित नाही.

शहर अभियंता :घनकचऱ्यासाठी किती वाहने लावण्यात आलेली आहेत माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :माहिती देण्यात यावी.

**श्री.बाळासाहेब मुंडे** : वार्ड वाईज कचरा किती उचलला आहे सांगण्यात यावे. माझ्या वार्डात गुंठेवारी भागात रोजच्या सरासरी दोनच 407च्या ट्रिप जात आहे. वाहनांची संख्या पाहता कचरा शहरात शोधावा लागेल. बिलापुरती फक्त नोंद केली जाते. माझ्याकडे सिडी तयार केलेली आहे. कचरा उचलुन डायरेक्ट डंम्पींगला जातो.

**उपअभियंता (यांत्रिकी)**:कचरा उचलण्यासाठी वार्ड वाईज माहिती पुढील प्रमाणे आहेत.
वार्ड अ- मनपाचे 6 आणि खाजगी ट्रक 2, 1 स्कीप लोडर हुक लोडर 1
वार्ड ब- मनपाचे 5 आणि खाजगी ट्रॅक्टर 12, 1 स्कीप लोडर
हुक लोडर 1, वार्ड क- मनपाचे 4 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर
हुक लोडर 1, वार्ड ड- मनपाचे 4 आणि खाजगी ट्रक 2, 1 स्कीप लोडर
इ- मनपाचे 5 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर, हुक लोडर 1
वार्ड फ- मनपाचे 4 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर =10

**मा.सभापती** : रिपोर्टींग कोण करत आहे.

**श्री.समीर राजुरकर** :संबधीत अधिकारी स्थायी समितीला हजर राहणे आवश्यक आहे. पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :रोजचा अहवाल प्रशासनाकडे प्राप्त झाला पाहिजे.

**श्रीमती निलाबाई जगताप**:मागील बैठकीत कचरा उचलण्याकरीता रिक्शाची मागणी केली होती अद्यापर्यंत देण्यात आलेली नाही.

**श्री.समीर राजुरकर** :यासंदर्भांत घनकचरा व्य.प्रमुख यांना वार्ड निहाय सविस्तर माहिती सभागृहापुढे सादर करण्याचे आदेश देण्यात यावे.

**मा.सभापती** :स.सदस्या श्रीमती निलाबाई जगताप यांचे वार्डात तातडीने रिक्शा लावण्यात यावे तसेच घनकचऱ्यासंबधी वार्ड निहाय सविस्तर माहिती सादर करावी. खाजगी वाहनाचे स्थायी समितीच्या आदेशाशिवाय कुठलेही पेमेंट अदा करण्यात येवु नये. कचऱ्याच्या नियोजनाबाबतीत प्रशासनाला आदेशित केले होते खुलासा करण्यात यावा.

**श्रीमती सविता घडमोडे**:वार्डात कचरा उचलण्यासाठी रिक्शा अद्यापर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही.

**उपअभियंता(यांत्रिकी)** :वार्ड इ कार्यालयाकरीता सर्वात जास्त 11 रिक्शा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

**मा.सभापती** :वाहनांचे योग्य नियोजन करण्यात यावे.

**श्री.नारायण कुचे** :कचरा उचलण्याबाबत कर्मचाऱ्यांचे व वाहनांचे योग्य पध्दतीने नियोजन नसल्यामुळे समस्या निर्माण होत आहे.

**मा.सभापती** :वजनावर कचरा उचलण्याबाबत प्रतिसाद न येण्याचे कारण म्हणजे कचरा उचलण्यासाठी जास्त मेहनत करावी लागेल.

**श्री.रेणुकादास वैद्य** :साफसफाईची जेवढी जबाबदारी प्रशासनाची आहे तेवढीच स.सदस्यांची आहे म्हणुन वेळोवेळी कचरा सफाईबाबत चर्चा करण्यात येते. वार्ड अधिकाऱ्यांना 16 वार्डाचे नियोजन का करण्यात येत नाही यामध्ये प्रशासन कमी पडत आहे. वाहनांची कमी नाही साफसफाईवर

लेबरची संख्या ही इतर महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या लेबरच्या संख्येपेक्षा कितीतरी जास्त आहे. काम करण्याची मानसिकता नाही, नियोजन नाही या दोन गोष्टी कचरा सफाई न करण्याबाबतीत कारणीभूत आहे. जोपर्यंत योग्यरितीने सर्व यंत्रणेचे नियोजन होणार नाही तोपर्यंत समस्या कायम राहील. 37 कोटी दरवर्षी सफाईवर खर्च होत आहे. खाजगीकरणाकडे जाण्याचा विचार केला पाहिजे. खाजगी तत्वावर टेंडर काढल्यास 30 कोटींच्यावर टेंडर जाणार नाही. याबाबतीत प्रशासनाने काय कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :पर ट्रिप काम करण्यास तयार आहे परंतु वजनाद्वारे कचरा उचलण्यास तयार नाही.

**शहर अभियंता** :खाजगी वाहने जे लावलेली आहेत ती वजनाद्वारे कचरा उचलण्यास प्रतिसाद देणार नाही.

**कार्य.अभियंता(श्री.पानझडे)**:मा.आयुक्तांनी घनकचऱ्याबाबतीत खाजगीकरण करता येईल का याबाबत विचारणा केली होती. याबाबतीत अभ्यास करून माहिती देण्यात यावी म्हणुन कळविण्यांत आले. घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रभाग कार्यालय, यांत्रिकी विभाग व क्रिसील या संस्थेत एकत्रित बसुन आढावा घेण्यात आला. घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रभाग कार्यालय, यांत्रिकी विभाग व कचरा सफाईचे 1400 मजूर यांचा खर्च साधारणत: 37 ते 38 कोटींचा खर्च होतो. इतर महानगरपालिकेमधील माहिती घेण्यात आली इतर मनपांनी प्रायव्हेट ऑपरेटर नेमण्यात आलेला आहे. डोअर टु डोअर कचरा कलेक्शन करायचा जो कचरा आहे त्यात ओला आणि सुका कचरा ज्याचे विघटन करायचे, त्याची वाहतुक करणे व डंपींग ग्राऊंड येथे कचरा टाकणे, घनकचऱ्याचे वजन मोजण्यासाठी महापालिकेतर्फे वजनकाटा बसविला जाणार आहे त्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमरा बसविण्यात येणार आहे. दिवसभरातील जमा झालेला कचऱ्याचे टनाप्रमाणे रक्कम अदा करणे, घनकचरा व्यवस्थापनासाठी असलेली महानगरपालिकेच्या मालकीची वाहने आहे त्या स्थितीत ताब्यात घेणे व वाहनांची देखभाल दुरूस्ती करणे यामुळे 24 खाजगी वाहने बंद होतील. रॅम्केच्या म्हणण्यानुसार लेबरने सहकार्य न केल्यामुळे फेल गेलेला आहे. त्यामुळे लेबर मनपाकडे ठेवायचे का? हा एक प्रश्न आहे. यामध्ये कचरा कुंडया बाद आहे. घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे यावर जो खर्च होणार आहे यामध्ये युजर चार्जेस लावणे आवश्यक आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :युजर चार्जेस घेऊन गॅरंटी काय आहे की, साफसफाई होईल.

**श्री.समीर राजुरकर** :प्रकल्प युजर फ्रेंडली असावा. कचरा उचलला गेला पाहिजे. अटी व शर्ती सक्तीच्या टाकल्या गेल्या पाहिजे. इतर महानगरपालिकामध्ये साफसफाई योग्यरितीने होते परंतु औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये योग्यरितीने साफसफाई होत नाही.

**कार्य.अभियंता (श्री.पानझडे) : सभेसमोर सविस्तर प्रस्ताव ठेवला जाणार आहे.**

**मा.सभापती :येणाऱ्या स्थायी समितीसमोर योग्य तो निर्णय घेण्यात येवुन माहिती देण्यात यावी.**

**कार्य.अभियंता (श्री.पानझडे) : रॅम्केचा आर्बीट्रेशनचा वाद सुरू आहे. हे प्रकरण निकाली निघाल्यावर या प्रस्तावाबाबत पुढील निर्णय घेण्याबाबत मा.आयुक्तांनी निर्णय दिलेला आहे.**

**श्री.समीर राजुरकर :प्राणी संग्रहालयात दोन युवतींचा मनपा कर्मचारी यांनी विनयभंग केलेला आहे. युवतींनी क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेली आहे.**

**संचालक,प्राणी संग्रहालय:प्राणी संग्रहालयात सर्पालयात काही महिला आल्या होत्या दोन युवतींची श्री.उजीवाल, दै.वे.लि. यांनी छेडछाड केल्याची लेखी तक्रार दिलेली आहे अशी माहिती दुरध्वनीद्वारे मिळालेली आहे.**

**मा.सभापती :याबाबतीत सविस्तर माहिती देण्यात यावी.**

**श्री.समीर राजुरकर :संबधीत प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी.**

**श्री.नारायण कुचे :कारवाई करण्यात यावी.**

**श्री.विजेंद्र जाधव :सदर बाब ही महानगरपालिकेची बदनामी करणारी आहे त्वरीत कारवाई करण्यात यावी.**

**संचालक,प्राणी संग्रहालय:सदरील घटना ही संस्थेची बदनामी करणारी आहे. नियमाप्रमाणे सदरील कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात येईल.**

**श्रीमती प्राजक्ता राजपुत :घटना सत्य असल्यास तात्काळ कारवाई करण्यात यावी.**

**मा.सभापती :लेखी अहवाल देण्यात यावा. तातडीने निर्णय घेऊन संबधीत कर्मचारी यांना निलंबीत करण्यात यावे.**

**श्री.समीर राजुरकर :पर्यटनासाठी कुणीही गार्डनमध्ये येणार नाही. कारवाई करण्यात यावी.**

**श्री.विजेंद्र जाधव :गार्डनमध्ये प्राणी संग्रहालयात बाहेरगांवचे पर्यटक पर्यटनासाठी येतात याचा गंभिर परिणाम होईल त्वरीत कारवाई करण्यात यावी.**

**श्री.नारायण कुचे :निलंबनाचे आदेश देण्यात यावे.**

**श्रीमती सविता घडमोडे :सदरील बाब अतिशय गंभिर आहे. महिलांच्या सुरक्षीततेचा प्रश्न आहे. संबधीतावर तातडीने कारवाई करण्यात यावी.**

**श्री.रेणुकादास वैद्य :उद्यानामध्ये वारंवार अशा पध्दतीचे प्रकार घडत असतात. सदर कर्मचारी अशा पध्दतीने वागत असल्यास त्यास पाठीशी घालण्यात येऊ नये. या शहरातील महिलांचे सुरक्षिततेचा प्रश्न आहे.**

**मा.सभापती :महानगरपालिकेच्या नौकरीवरून कमी करण्यात यावे.**

**श्री.नारायण कुचे :एलबीटीबाबत महाराष्ट्र राज्य लॉटरी टिकीटावर जकात वसुल करणेबाबत दिनांक 12 जुलै 1995 चे परिपत्रक प्रशासनाकडुन देण्यात आलेले आहे. जकातीला ज्या पध्दतीचे नॉर्मस् लागू आहे त्याच पध्दतीचे नॉर्मस् एलबीटीला लागू आहे का? एलबीटी बाबत प्रशासन दिशाभुल करीत आहे. संबधीतांवर कारवाई करण्यात यावी. सन 1994चे परिपत्रक दाखविण्यात येते. संबधीत प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे.**

**मा.सभापती :सन 2011 मध्ये एलबीटी लागू झालेली आहे.**

**एलबीटी कक्ष प्रमुख :जकात असतांना ज्या वस्तुंवर कर होता त्याच वस्तुंवर एलबीटी लागू आहे. लॉटरी टिकीटावर एलबीटी नाही. 698 पेजेसचे शेडयुल आहे. एक्साईझच्या टेरीफमध्ये लॉटरी टिकीट कार्डस् आलेले आहे. त्याच्यावर**

एक्साईझ डयुटी असल्यामुळे ते नील होते. 2 टक्के चुकून प्रिंट झालेले आहे. माल या संज्ञेमध्ये लॉटरी टिकीट येत नाही. शासनाचे तसे आदेश आहे.

**श्री.नारायण कुचे** :मा.आयुक्तांनी याबाबतीत चौकशी करण्यात यावी. ही बाब महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीशी संबधीत आहे.

**मा.सभापती** :याबाबतीत सविस्तर चौकशी करून पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

**श्रीमती प्राजक्ता राजपूत** :मनपाच्या शालेय विद्यार्थ्यांची संख्या किती तसेच विद्यार्थ्यांना गणवेश, बुट,सॉक्स मागील वर्षी किती वाटप केले शिल्लक राहिलेले साहित्य, गणवेश कुठे आहे व किती आहे. तसेच या वर्षी प्रशासनाने शाळेच्या पहिल्या दिवसांपासून ड्रेसचे वाटप झाले पाहिजे. याबाबतीत प्रशासनाचे नियोजन काय आहे.

**शिक्षणाधिकारी** :गतवर्षीची आकडेवारी माझ्याकडे नाही. गणवेश देण्याची गेल्या दोन वर्षाची पध्दत सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातुन मागासवर्गीय विद्यार्थीनी आणि बीपीएलमधील सर्व विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी रूपये 400 प्रमाणे अनुदान विद्यार्थी संख्येनुसार वितरीत केले जाते. विद्यार्थ्यांना गणवेश शिऊन देणेबाबाबत आणि वाटप करणेबाबतची जबाबदारी शालेय व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आलेली आहे. ज्यावेळी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातुन अनुदान प्राप्त होते त्यावेळी निर्धारित केलेली विद्यार्थी संख्येनुसार धनादेश शालेय स्तरावर वाटप करण्यात येते. शासनाने सूचना केलेल्या आहेत की, या वर्षीपासूनच विद्यार्थ्यांचे गणवेशासाठी मापे घेऊन ठेवायची आहे. विद्यार्थ्यांना लागत असलेला एकुण कापडाचे रेकॉर्ड ठेवायचे आहे. मनपाचे एकुण 17000 विद्यार्थी आहेत त्यातील एकुण 14000 विद्यार्थी याबाबत पात्र ठरत आहे. विहीत वेळेत ड्रेस वितरीत करायचे आहे. उर्वरित 3000 विद्यार्थ्यांना मा.आयुक्तांच्या सूचनेनुसार प्रत्येकी 400 प्रमाणे 12 लाख रूपये अर्थसंकल्पात तरतुद करण्याची सूचना केलेली आहे. एप्रिलच्या अखेरीस किंवा मे च्या सुरवातीस अनुदान प्राप्त होण्याची शक्यता आहे. 30 एप्रिलपर्यंत विद्यार्थ्यांचे मापे घेणे अपेक्षित आहे. शाळा व्यवस्थापन समितीने निर्णय घेतला तर शाळा सुरू झाल्याबरोबर ड्रेस वाटप करू शकतो. सूचना दिलेल्या आहेत.

**श्री.समीर राजुरकर** :याबाबतीत शालेय व्यवस्थापन समितीला पत्र देण्यात यावे.

**मा.सभापती** :विद्यार्थ्यांचे नुकसान होता कामा नये. शालेय व्यवस्थापन समितीला प्रशासनाने सूचना देण्यात यावे. शाळा सुरू झाल्याबरोबर गणवेश मिळतील याबाबतीत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.आगा खान मिया खान**:जुना बाजार व परिसरातील थकबाकी असलेल्या दुकानांना प्रशासनाने सिल करण्यात आले होते. वसुली किती झाली याबाबत माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :माहिती देण्यात यावी.

**मुख्य वसुली अधिकारी :वार्ड अ मध्ये 20 ते 22 दुकाना सिल केलेले आहे. दोन ते तीन जणांनी पैसे भरलेले आहे. 50 टक्के रक्कम अदा केलेल्या दुकानांचे सिल उघडण्यात येते.**

**श्री.आगा खान मिया खान : राजस्थान आईस्क्रीम ॲण्ड चाट भंडार यांनी किती रक्कम भरली व दुकानाचे सिल केव्हा उघडले.**

**मुख्य वसुली अधिकारी : याबाबतची माहिती घेण्यात येईल.**

**श्री.आगा खान मिया खान :मेडीकलचे वर्षाचे भाडे 75000 रूपये होते. जागेवर 1 लाख रूपये भरण्यास तयार आहे. परंतु अधिकारी भरून घेण्यास तयार नाही.**

**मुख्य वसुली अधिकारी :उर्वरित चेक त्यांनी पोस्टडेटेट देण्यात यावे. एका अधिकाऱ्यांस पुन्हा पुन्हा त्या दुकानांनकडे जाणे शक्य नाही.**

**श्री.समीर राजुरकर :सन 1980 रोजी एका हॉटेल बंद झालेले आहे त्यांचे लाईसन्स सील केलेले आहे. त्यांनी मनपाकडे अनेक पत्र दिलेले आहे. व्यवसायीक वापर नाही. धोकादायक इमारत म्हणुन घोषित झालेली आहे. त्यांना नोटीस पाठविण्यात आलेली आहे त्यांना 1 लाख 86 हजार रूपये कर लावण्यात आलेला आहे.**

**मुख्य वसुली अधिकारी :जो टॅक्स लागलेला आहे तो रेकॉर्डवर आलेले आहे आणि कमीत कमी 50 टक्के अदा करणे आवश्यक आहे.**

**श्री.रेणुकादास वैद्य :याबाबतीत प्रशासनाने योग्य धोरण अवलंब करणे आवश्यक आहे.**

**श्री.समीर राजुरकर : टॅक्स संदर्भात जो निर्णय होईल त्याच्या मान्यतेच्या अधिन Under Protest 1 लाख रूपये भरून घेण्यात यावे.**

**मा.सभापती : टॅक्स संदर्भात जो निर्णय होईल त्याच्या मान्यतेच्या अधिन रक्कम भरणा करून घ्यावी.**

**मुख्य वसुली अधिकारी :मा.आयुक्तांनी वार्ड अधिकारी,विधी सल्लागार,करमुल्य निर्धारक व संकलक, विशेष कर आकारणी कक्ष यांची कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे.**

**श्री.समीर राजुरकर :प्रचलित पध्दतीची माहिती सर्व स.सदस्यांना आहे. याबाबीची माहिती सर्वांना देण्यात यावी.**

**मा.सभापती :चेक घेऊन मेडीकल दुकानाचे सिल उघडण्यात यावे.**

**श्री.रेणुकादास वैद्य :श्री.झनझन, मुख्य वसुली अधिकारी चांगल्याप्रकारे थकबाकी वसुलीचे काम करीत आहे. त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. 13 लाख लोकसंख्येचे शहर आहे. 1 लाख 61 हजाराच्या मालमत्तांची नोंद आहे. शहरातील 25 ते 30 टक्के भागाचे आजही टॅक्स आकारणी झालेली नाही. अनेक मेघा प्रोजेक्ट शहरात आलेले आहे. त्यांना अद्यापपर्यंत डिमांड देण्यात आलेली नाही. या मालमत्तांना महानगरपालिकेच्या सर्व सुविधा देण्यात आलेल्या आहेत. नविन असेसमेंट ही महानगरपालिकेत शुन्य टक्के आहे. प्रशासन उत्पन्नवाढी संदर्भात गांर्भीयाने कार्यवाही करणार आहे का?**

**श्री.नारायण कुचे :मुकूंदवाडी भागातील मालमत्तांचे नावांसहीत यादी देण्यात आली होती त्या मालमत्तांना अद्यापपर्यंत टॅक्स आकारण्यात आलेला नाही परंतु प्रशासन याकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे कोणतीही कार्यवाही केली जात नाही.**

मा.सभापती :औरंगाबाद महानगरपालिकेत मजूर टॅक्स ॲसेसमेंन्ट करतात. या विभागाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

श्री.रेणुकदास वैद्य :टॅक्स संदर्भांत स्थायी समितीची विशे्ष सभा आयोजित करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :स्थायी समिती आयोजित करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात यावे की, वार्डातील नागरीकांच्या टॅक्स संदर्भांत काही तक्रारी असल्यास बैठकीपुर्वी संबधीत वार्डातील नगरसेवकांशी संपर्क साधुन तक्रारी देण्यात याव्यात.

मा.सभापती :मालमत्ता कर आकारणी व कर वसुली संदर्भांत विशेष स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यात यावे तसेच शहरातील एकुण मालमत्ता, मॉल, हॉटेल, लॉन व टॅक्स न लावलेल्या मालमत्तांचा तपशिल यासह कर आकारणी विभागात सध्या कार्यरत कर्मचारी नांव, पदनाम व त्यांचेकडील कामाचे स्वरूप याबाबतची सविस्तर माहिती पुढील सभेपुर्वी देण्यात यावी.

श्री.आगा खान मिया खान : कैलास नगर येथील रस्ता रूंदीकरणानंतर झालेले अतिक्रमण तात्काळ काढण्यासंदर्भांत आदेश देण्यात आले होते परंतु अतिक्रमण काढण्यात आलेले नाही.

मा.सभापती :वेळोवेळी या विषयी चर्चा झालेली आहे.

अतिक्रमण विभाग प्रमुख:रस्ता रूंदीकरणात मार्कींगच्या पुढे आलेले अतिक्रमण येत्या 48 तासात काढण्यात येतील.

मा.सभापती :कैलास नगर येथील रस्ता रूंदीकरणानंतर झालेले अतिक्रमण 48 तासात निष्कासित करण्यात यावे.

श्री.आगा खान मिया खान:वार्डातील रस्ता अर्धेवट अवस्थेत तसाच सोडलेला आहे.

उपअभियंता :वार्डातील मंदिरापर्यंत डांबरीकरण झालेले आहे. मंदिर असल्यामुळे 60 मिटरचे काम शिल्लक आहे. दिड ते दोन किलोमिटरचे अतिक्रमण काढण्याचे काम बाकी आहे. अतिक्रमण काढल्यास पुढील काम करण्यात येईल.

श्री.विजेंद्र जाधव :बारापुल्लागेट, मकईगेट येथील अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. परंतु अर्धवट रस्त्यांचे काम करण्यात आलेले आहे.

अतिक्रमण विभाग प्रमुख:तेथील काही मालमत्ताधारकांनी मा.न्यायालयातुन स्टे आणलेला आहे त्यामुळे काम अर्धवट स्थितीत राहिलेले आहे.

विधी सल्लागार :या प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयामध्ये श्रीमती अरजरी बेगम नावाच्या मालमत्ताधारकाने याचिका दाखल केली होती. भुसंपादनाची कायदेशिर प्रक्रीया केल्याशिवाय ताबा घेऊ नये म्हणुन मा.न्यायालयाचे आदेश आहेत.

श्री.विजेंद्र जाधव :सदरील मालमत्ताधारक सोडुन इतर मालमत्ताधारक मालमत्ता देण्यास तयार आहे. त्यांच्या मालमत्ता ताब्यात घेण्यात यावे.

सहा.संचालक न.र. :मिलकॉर्नर ते बारापुल्ला येथील सर्वांना विनंती पत्र दिलेले आहे की, रस्त्यात बाधीत होणारे क्षेत्रासाठी आपणाला ज्या प्रकारचा मोबदला पाहिजे तो देण्यास महानगरपालिका तयार आहे. ज्यांनी संमती दिली आहे त्यांची प्रक्रीया सुरू झालेली आहे. खाजगी वाटाघाटीने घेण्यास तयार नसल्यामुळे मा.उच्च न्यायालयामध्ये श्रीमती अरजरी बेगम नावाच्या मालमत्ताधारकाने याचिका दाखल केली होती. भुसंपादनाची कायदेशिर

प्रक्रीया केल्याशिवाय ताबा घेऊ नये म्हणुन मा.न्यायालयाचे आदेश आहेत. इतर प्रॉपर्टीमध्ये कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :संबधीत मालमत्ताधारक सोडुन इतर नागरीक तयार असेल तर प्रक्रीया सुरू करण्यात यावी.

श्री.विजेंद्र जाधव :रस्तारूंदीकरणामध्ये नागरीकांचे घरे ताब्यात घेण्यात आले होते बाधीत नागरीकांना लाभ केव्हा मिळणार आहे. ते बेघर झाले आहे मा.तत्कालिन आयुक्त यांनी मदत देण्याचे आश्वासन केले होते.

शहर अभियंता :अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांना शासनाच्या स्किमचा लाभ देण्यात येतो.

श्री.विजेंद्र जाधव :वक्फबोर्डाची प्रॉपर्टी असल्यामुळे संबधीत नागरीक लीजहोल्डर आहेत. मा.तत्कालिन आयुक्त यांनी मदत देण्याचे आश्वासन केले होते.

सहा.संचालक न.र. :संबधीत मालमत्ताधारक वक्फबोर्डाच्या प्रापर्टीवर लीजहोल्डर आहेत. त्यामुळे कुठल्याही भरपाईस पात्र ठरत नाही. तथापी मा.आयुक्तांच्या समवेत झालेल्या बैठकीत त्यांचा सहानुभूतीने विचार करण्यात येईल अशा पध्दतीने चर्चा झाली होती. याबाबतीत संचिका मा.आयुक्तांकडे सादर करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :टि.व्ही.सेंटर चौक ते प्यासा वाईन शॉपपर्यंत अतिक्रमण काढण्यात आले परंतु स.सदस्या श्रीमती चित्ते यांच्या वार्डातील ग्रीनबेल्टमध्ये अंडीभुर्जीच्या हातगाडया अनाधिकृतपणे लावल्याजात आहे. दारूच्या बाटल्यांचा खच पडत आहे. इमारत निरीक्षक हे काहीही कारवाई करत नाही. इमारत निरीक्षक यांनी संबधीतांविरूध्द गुन्हे दाखल करण्याचे व अतिक्रमण काढण्याचे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती :सिडको टि.व्ही.सेंटर परिसरातील ग्रीनबेल्ट मधील अंडाभुर्जी विक्री करणाऱ्या हातगाडयांचे अतिक्रमण त्वरीत काढण्यात यावे टि.व्ही.सेंटर चौकातील अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे.

याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद